# प्रकरण-८ : लिंगविचार

Page No. :
Date : / /

लिंग = चिन्ह / खुण

★ लिंग :-

लिंग याचा अर्थ खुण किंवा चिन्ह असा होतो.

नामाच्या रूपावरून एखादी वस्तू वास्तविक अगर काल्पनिक पुरूषजातीची आहे की स्त्रीजातीची आहे किंवा दोन्हीपैकी कोणत्याच जातीची नाही हे ज्यावरून कळते त्याला लिंग असे म्हणतात.

★ लिंगाचे तीन प्रकार :-

1). पुल्लिंग :-

पुरूष किंवा नर जातीच्या शब्दाला पुल्लिंग असे म्हणतात.

तो हे सर्वनाम वापरून पुल्लिंग ठरवावे.

उदा., तो घोडा, मुंगळा, चुलता, शिक्षक, मास्तर इत्यादी.

2). स्त्रीलिंग :-

स्त्री अथवा मादी जातीच्या शब्दाला स्त्रीलिंग असे म्हणतात.

ती हे सर्वनाम वापरून स्त्रीलिंग ठरवावे.

उदा., ती घोडी, मुंगी, शिक्षिका, मास्तरीन, चुलती, वाघीन इत्यादी.

3). नपुंसकलिंग :-

एखाद्या नामावरून पुरूष अथवा स्त्री असा कोणताही बोध होत नसल्यास त्याला नपुंसकलिंग असे म्हणतात.

ते हे सर्वनाम वापरून नपुंसकलिंग ठरवावे.

उदा., ते गाव, पुस्तक, गवत, फुल, मुल इत्यादी.

★ लिंगभेदामुळे नामाच्या रूपात होणारा बदल :- (१२)

१) 'आ' चे ई व ए :-

आकारान्त पुल्लिंग प्राणीवाचक नामाचे स्त्रीलिंगी रूप इकारान्त व नपुसकलिंगी रूप एकारान्त होते.

| | पुल्लिंग | स्त्रीलिंग | नपुंसकलिंग |
|---|---|---|---|
| १. | कारटा | कारटी | कारटे |
| २. | मुलगा | मुलगी | मुलगे |
| ३. | पोरगा | पोरगी | पोरगे |
| ४. | घोडा | घोडी | घोडे |
| ५. | कुत्रा | कुत्री | कुत्रे |
| ६. | कोल्हा | कोल्ही | कोल्हे |
| ७. | लांडगा | लांडगी | लांडगे |
| ८. | बकरा | बकरी | बकरे |

२). आकारान्त व विकारान्त पुल्लिंगी नामास इन प्रत्यय लागून:

काही पुल्लिंगी प्राणीवाचक शब्दास इन प्रत्यय लागून त्यांची स्त्रीलिंगी रूपे होतात.

| | पुल्लिंग | स्त्रीलिंग |
|---|---|---|
| १. | वाघ | वाघीन |
| २. | सुतार | सुतारीन |
| ३. | कुंभार | कुंभारीन |
| ४. | पाटील | पाटलीन |
| ५. | माळी | माळीन |
| ६. | तेली | तेलीन |
| ७. | धोबी | धोबीन |
| ८. | लोहार | लोहारीन |
| ९. | सिंह | सिंहीन |

Page No. :
Date : / /

३) अ चे ई :-
आकारान्त पुल्लिंगी नामाचे स्त्रीलिंगी रूप इकारान्त होते

| | पुल्लिंग | स्त्रीलिंग |
|---|---|---|
| १. | तरुण | तरुणी |
| २. | वानर | वानरी |
| ३. | गोप | गोपी |
| ४. | दास | दासी |
| ५. | गाढव | गाढवी |
| ६. | ब्राह्मण | ब्राह्मणी |

४). आ चे ई :-
आकारान्त पुल्लिंगी पदार्थवाचक नामांचे स्त्रीलिंगी रूप उ लघुत्व दर्शक इकारान्त होते.

| | पुल्लिंग | स्त्रीलिंग |
|---|---|---|
| १. | खडा | खडी |
| २. | लोटा | लोटी |
| ३. | दांडा | दांडी |
| ४. | आरसा | आरशी |
| ५. | सुरा | सुरी |
| ६. | भाकरा | भाकरी |

५) स्वतंत्र रूपे :-
संस्कृतमधून मराठीमध्ये आलेले शब्द ई प्रत्यय लावुन त्यांची स्त्रीलिंगी रूपे होतात.

| पुल्लिंग | स्त्रीलिंग |
|---|---|
| युवा | युवती |
| राजा | राज्ञी (राणी) |
| विद्वान | विदुषी |
| ग्रंथकरता | ग्रंथकरती |
| जनक | जननी |

६. काही शब्दांचे स्वतंत्र रितीने स्त्रीलिंगी रूपे होताना दिसतात

| | पुल्लिंग | स्त्रीलिंग | | पुल्लिंग | स्त्रीलिंग |
|---|---|---|---|---|---|
| १. | उंट | सांडणी | ९. | रेडा | म्हैस |
| २. | बोका | भाटी | १०. | व्याही | विहीन |
| ३. | मोर | लांडोर | ११. | पुरुष | स्त्री |
| ४. | बाबा | माय | १२. | वाघ्या | मुरळी |
| ५. | दीर | जाऊ | १३. | साधु | साध्वी |
| ६. | पुत्र | कन्या | १४. | विधुर | विधवा |
| ७. | मुलगा | सून | १५. | सासरा | सासू |
| ८. | खोंड | कालवड | | | |

७. काही शब्द निरनिराळ्या लिंगामध्ये आढळून येतात :-

| | पुल्लिंग | स्त्रीलिंग | नपुंसकलिंग |
|---|---|---|---|
| १. | पोर | पोर | पोर |
| २. | फुल | फुल | फुल |
| ३. | संधी | संधी | - |
| ४. | वेळ | वेळ | - |
| ५. | बाल | बाल | - |
| ६. | ढेकर | ढेकर | - |
| ७. | तंबाखू | तंबाखू | - |
| ८. | नेत्र | - | नेत्र |
| ९ | हरीण | - | हरीण |
| १० | मुंगुस | - | मुंगुस |
| ११. | - | मांजर | मांजर |

८. परकीय (इंग्रजी) शब्दांचे लिंग मराठी नावावरून ठरवितात :-

बुट - जोडा - पुल्लिंग
पेन्सिल - लेखणी - स्त्रीलिंग
बुक - पुस्तक - नपुंसकलिंग

९). सामासिक शब्दाचे लिंग सामासिक शब्दांच्या शेवटच्या शब्दावरून ओळखतात :-

आजीपाला - पुल्लिंग
भाऊबहीण - स्त्रीलिंग
देवघर - नपुंसकलिंग

टीप :- सामासिक शब्द एकाच घटकासाठी वापरल्यास त्या घटकावरून लिंग ठरवावे.
उदा., सिताराम - पुल्लिंग
बाईमाणूस - स्त्रीलिंग

१०). खालील शब्दांत नर व मादी असा भेद असला तरी ते स्त्रीलिंगीच मानतात :-
उदा., घार पिसू तांब भालू
सुसर जळू गोचडी
घुस मैना किड
ऊ गोचिड बोरपड

११). खालील प्राण्यांमध्ये नर व मादी असले तरी त्यांचे लिंग पुल्लिंगी मानतात :-
उदा., साप मगर गेंडा मासा ढेकून
टोळ सुरवंट गिधाड गरुड
बेडूक कावळा उंदीर पोपट

१२). एकाच वस्तूला वेगवेगळ्या नावांनी संबोधले तर त्या नावावरून लिंग बदलू शकते.

| पुल्लिंग | स्त्रीलिंग | नपुंसकलिंग |
|---|---|---|
| ग्रंथ | पोथी | पुस्तक |
| दिवा | पणती | तेज |
| देह | काया | शरीर |
| वाडा | इमारत | घर |
| टाक | लेखणी | पेन |